ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July-December 2024- Vol. 13 No. 2

# सर्जनशील लेखनशैली

**डॉ. मनोहर नाईक, नागपूर**

*मानव हा जीवसृष्टीतील सर्वात बुद्धिमान प्राणी आहे. निसर्गाने मानवाला अतीतीव्र भावना आणि संवेदना दिल्या आहेत. माणसाजवळ कुशाग्र बुद्धिमत्ता आहे. माणूस हा निरंतर विकसित होणारा आणि हे जग सतत विकसित करणारा सर्जनशील कलावंत आहे.*

*प्रज्ञा आणि प्रतिभेच्या बळावर माणसाने ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या प्रज्ञा-प्रतिभेच्या जोरावर त्याने अनेक कला जन्मास घातल्या आहेत. स्वतंत्र, समृद्ध व संपन्न असे कलाविश्व त्याने साकार केले आहे. चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य, संगीत, नाट्य, अभिनय, साहित्य अशा विविध कलांना मानवी समाजाने आपल्या भावना, वेदना, संवेदना व विचारांच्या प्रकटीकरणाचे माध्यम बनविले आहे. या कलांमुळे मानवी जीवन अधिक सुसह्य, परिपूर्ण, सुंदर, आनंदी व संवादी झाले आहे. मनुष्यनिर्मित सर्वच कलांमधून समाजजीवनाच्या स्थितीगतीचे व त्याच्या वाटचालीचे प्रतिबिंब उमटले आहे. या सर्वच कलांची निर्मिती व्यक्तिमनातील स्थायीभावांच्या अभिव्यक्तीसाठी झाली आहे. या कला प्रेम, राग, लोभ, द्वेष, भय, आनंद या भावाभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहेत. त्यातही साहित्य कला ही अधिक प्रवाही, प्रभावी व परिणामकारक आहे.*

समाजाच्या एकूणच जडणघडणीत साहित्याचे योगदान फार मोठे आहे. साहित्य हे मानवी संस्कृतीच्या निर्माणाचे मुख्य स्रोत आहे. समाजाला प्रवाहित, दिग्दर्शित आणि नियंत्रित करण्याचे फार मोठे सामर्थ्य साहित्यात आहे. कारण इतर कलांजवळ नाही अशी एक अद्‌भुत शक्ती साहित्याजवळ आहे आणि ती शक्ती आहे शब्दांची! या शब्दांच्या असीम शक्तीमुळेच साहित्य कलेमध्ये नवनिर्माणाचे सामर्थ्य अधिक आहे. तशा सर्वच कला निर्माणक्षम आहेत, परंतु साहित्याच्या अंगी ही निर्माणक्षमता अधिक आहे. कारण साहित्य हे संवादी असते. साहित्य वाचकांशी थेट संवाद करते. त्याच्या भाव-विचारांना आंदोलित करते. साहित्यात वाचकाला प्रवृत्त-परावृत्त करण्याचे सामर्थ्य असते. म्हणूनच साहित्य समाजात क्रांती तसेच प्रतिक्रांतीही घडवून आणू शकते, असे म्हटले जाते.

कोणतीही कला ही प्रतिभेचे अपत्य असते. प्रतिभावंताच्या कुशीतूनच कला जन्मास येत असते. कलावंताच्या वा प्रतिभावंताच्या हातून कलाकृती निर्माण होणे हे नवसृजनच असते. जी कलाकृती समाजाकरिता दिशादर्शक व पथदर्शक ठरते ती खऱ्या अर्थाने सर्जनशील कलाकृती असते. ती समाजाला विशिष्ट मार्गावरून, विशिष्ट दिशेने पुढे जाण्यास व काही कृती अथवा विचार करण्यास प्रेरित करते. ही सर्जनशीलता कलाकृतीच्या आशय विषयात आणि शैलीत दडलेली असते, हे अगदी खरे आहे. परंतु हेही तेवढेच खरे आहे की, शैली ही आशयावर आणि विषयावर देखील अवलंबून असते. किंबहुना शैली ही आशयाविषयाचे पंख लावूनच साहित्याच्या अवकाशात विहारत असते. शैली कलाकृतीचे बाह्यांग वाटत असली तरी आशयाचे सत्व घेवूनच ती अवतरत असते. आशय हा लेखनकृतीचा प्राण असतो, तर शैली शरीर असते. शैलीची वृत्तीशी आणि विचारांशी नाळ जुळलेली असते. वृत्ती मुक्त, उदात्त असेल तर शैली या मुक्ततेची व उदात्ततेची उधळण करीतच अवतरत असते. शैली अधिक व्यापक, मोहक व समावेशक रूप धारण करते. शैली आशयाची वाहक असते. कोणत्याही लेखनातून अथवा कलेतून प्रतिभावंताच्या वा कलावंताच्या मनातील भावविचार तर व्यक्त होतातच, परंतु शैलीच्या माध्यमातून ते वाचकांच्या मनांपर्यंत अधिक प्रभावी व परिणामकारकपणे पोहोचतात. मराठी साहित्य हे सर्वार्थाने समृद्ध व संपन्न साहित्य आहे. मराठी साहित्याचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे. संत साहित्यापासून सुरू झालेला प्रवास आज आधुनिक आणि उत्तर-आधुनिकतेपर्यंत येवून पोहोचला आहे. या प्रदीर्घ प्रवासात अनेक टप्पे ओलांडून हे साहित्य इथवर आले आहे. अनेक नवनवीन साहित्यप्रवाह या साहित्याने आपल्या कवेत घेतले आहेत. वेगवेगळ्या विचारप्रवाहांनी हे साहित्य समृद्ध आणि सर्वांगीण झाले आहे. अनेक संतांनी आणि कृतिशील विचारवंतांनी या साहित्याचे क्षितीज विस्तीर्ण केले आहे. आपल्या विचारतेजाने अनेक प्रतिभासूर्य या क्षितिजाला प्रकाशमान करून गेले आहेत. आध्यात्मिक भक्ती ते विद्रोहात्मक शक्ती असा या साहित्याचा एकंदरीत प्रवास आहे. संतकवितेने मराठी जनांना 'आनंदाचे डोही' बुडवून त्यांच्या मनात 'आनंद तरंग' निर्माण केले आहेत. ही संतांच्या लेखनशैलीची सर्जनशीलता आहे. एकूणच संतांची लेखनशैली समाजमनाचा तळ गाठणारी आणि अधर्मात बुडत्या मनाला वर काढणारी आहे. संतकवितेने महाराष्ट्राला

भजन-कीर्तनाच्या तालावर अक्षरशः डोलायला लावले आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी ...' असे अंतर्मनात ज्ञानाचे दीप लावण्यासाठी या साहित्याने समाजमनास प्रवृत्त केले आहे. पंडिती कवितेने अलंकारिक भाषेचा अमर्याद वापर करून महाराष्ट्रातील अभिजनांना मराठी भाषेचे अफाट शब्दसामर्थ्य दाखवून दिले, तर मराठी शाहिरीने अवघ्या महाराष्ट्राला तुणतुण्याच्या तालावर आणि ढोलकीच्या बोलावर थिरकायला लावले. शाहिरी कवितेला आधुनिक मराठी कवितेची पहाट म्हटले गेले आहे. या कवितेने धर्माचे बंध सैल करून मराठी मनांना थोडा मोकळा श्वास घेण्यासाठी लावणी आणि पोवाड्याचा झरोका उघडून दिला. राधा-कृष्णाचा आडोसा घेऊन व्यक्त होणारे प्रेम शाहिरी कवितेमुळे राजरोसपणे व्यक्त होऊ लागले. 'सुंदरा मनामध्ये भरली, हवेलीत शिरली ...' हे म्हणण्याचे धाडस शाहिरी कवितेने मराठी मनात जागवले. शाहिरी कवितेच्या या मराठमोळ्या, रांगड्या, दिलदार आणि पिळदार लेखनशैलीने उन्मुक्त समाजनिर्मितीला जणू बळ दिले आहे. म्हणूनच ही काव्यलेखनशैली सृजनशील ठरणारी आहे.अव्वल इंग्रजी कालखंड हा भारतीय समाजमनाच्या जडणघडणीचा आणि आधुनिक साहित्याच्या उत्कर्षाचा काळ आहे. या काळात भारतीय समाज इंग्रजी सत्तेच्या, संस्कृतीच्या व साहित्याच्या संपर्कात आला. सार्वत्रिक शिक्षणपद्धतीमुळे तो शिकू लागला. वाचू लागला. विचार करू लागला. नवी जीवनमूल्ये आणि आधुनिक विचारसरणी अंगीकारू लागला. इंग्रजांच्या अनुकरणाने व प्रेरणेने लिहू लागला. इंग्रजी साहित्य वाचनातून अभिव्यक्तीचे नवनवीन प्रकार व लेखनशैली अवगत करू लागला. मराठी साहित्यात नवे साहित्य प्रकार रूढ होऊ लागले. कादंबरी, वैचारिक निबंध, ललित निबंध, कथा, नाट्यछटा, लघुनाट्य , सुनीत, विनोदी लेखन अशा नवनवीन साहित्यप्रकारातून लेखन होऊ लागले. वेगवेगळ्या समाजस्तरातील जीवनानुभव साहित्यात येऊ लागले. नवनवीन साहित्यप्रकारांच्या आणि लेखनशैलीच्या अंगाने मराठी साहित्याला नवे धुमारे फुटू लागले. साहित्य ही संकल्पना अतिशय व्यापक आहे. समग्र जीवनाला कवेत घेण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे. साहित्य हा मनातील सूक्ष्मातीसूक्ष्म भावस्पंदने टिपणारा कार्डिओग्राफ आहे. कोणताही कवी अथवा लेखक आपल्या मनातील भावविचार प्रभावीपणे व्यक्त करण्याकरिता साहित्य कलेचा आधार घेतो. त्याच्या दृष्टीने सर्वथा योग्य, सोयीच्या व जवळच्या वाटणाऱ्या लेखनप्रकारातून तो अभिव्यक्त होतो. प्रत्येक लेखनप्रकाराचा विशिष्ट असा एक आकृतीबंध असतो. त्या आकृतीबंधाच्या चौकटीत कवी, लेखक आपल्या भावविचारांची मांडणी करतो. परंतु ही मांडणी करीत असताना तो त्याच्या कल्पकतेचे व प्रतिभेचे स्वत्व वापरून अभिव्यक्तीच्या अंगाने जी कलाकुसर करतो ती त्या कवीची अथवा लेखकाची स्वतंत्र शैली असते. ही लेखनशैली त्याच्या वृत्ती व विचारांवर अवलंबून असते. वृत्ती स्थितीवादी असेल, 'जैसी स्थिती आहे तैशापरी राहे कौतुक तू पाहे । संचिताचे... ' अशा स्वरूपाची असेल तर अभिव्यक्तीचा आवेग संथ राहण्याची शक्यता असते. परंतु वृत्ती जर, ' जुने जाउ द्या मरणालागुनि , जाळुनि किंवा पुरुनी टाका, ... सावध ! ऐका पुढल्या हाका !...' अशी गतीवादी असेल तर अभिव्यक्तीत स्वाभाविकतः आवेग येतो. गती हाच अशा लेखनशैलीचा स्वभाव होतो. वृत्तीप्रमाणेच विचारदेखील लेखनशैलीच्या संदर्भात परिणामकारक ठरणारा असतो. विचार जर , ' आशयाचा तूच स्वामी ! शब्दवाही मी भिकारी...' असा ईश्वरशरण अथवा व्यवस्थाशरण असेल तर लेखनशैली सुद्धा सामान्य आणि सपाट होते. याऊलट कवी किंवा लेखकाची विचारसरणी झुंजार व उजेडगामी असेल तर, 'मी विराट पसरून पंख घेतली झेप ... मी धडका मारित उडतो अग्निनभात ...' अशी अफाट आणि प्रवाही होत ती 'युगान्तराचे गाणे' होते.

कोणत्याही लेखनाची शैली ही लेखकाच्या वृत्ती-प्रवृत्तीशी म्हणजे एकूणच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित असते. लेखनशैली वाचकांवर परिणामतः समाजमनावर दूरगामी परिणाम करणारी असते. पुरोगामी दृष्टी लाभलेल्या प्रतिभावंताची शैली समाजाला दिशादर्शक व मार्गदर्शक ठरणारी असते. पुरोगामी प्रतिभावंताच्या लेखणीतून लिहिली गेलेली कविता किंवा कोणतेही लेखन समाजाला विचारप्रवृत्त करणारे आणि परिवर्तन घडविणारे असते. केशवसुत, बालकवी, बी, अनिल, कुसुमाग्रज, विं. दा. करंदीकर, वामनदादा कर्डक, यशवंत मनोहर इत्यादी कवींच्या कवितांनी व त्यांच्या काव्यशैलीने समाजमनात लोकशाही मूल्ये रुजविण्याचा आणि समाजाला समतानिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला आहे. कथेच्या क्षेत्रात ना. ह. आपटे, वा. म. जोशी, वि.स. खांडेकर, कोल्हटकर, अण्णा भाऊ साठे, वा. कृ. चोरघडे, बाबुराव बागुल, वामन होवाळ इत्यादी कथाकारांनी व कादंबरीकारांनी त्यांच्या लेखनशैलीने मराठी मनांचे मनोरंजन तसेच ज्ञानरंजन केले आहे. विचारविन्मुख समाजभूमीत खऱ्या अर्थाने विचारांचे

बीजारोपण केले ते वैचारिक निबंधलेखनाने ! मराठी निबंधांनी महाराष्ट्रात परिवर्तनाचा पाया घातला. बाळशास्त्री जांभेकर, महात्मा जोतीराव फुले, गो. ग. आगरकर, लोकहीतवादी, रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी निबंधकारांनी आपल्या वैचारिक लेखनातून समाजाला जागवण्याचे व त्याची जडणघडण करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. या सर्वच निबंधकारांची लेखनशैली अतिशय परखड, सडेतोडे, निग्रही, आग्रही आणि दिशादर्शक होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धारदार लेखनशैलीने तर हजारो वर्षांची पडिक जमीन एवढी सुपिक केली की, आज या जमिनीतून वाङ्मयाचे अतिशय जोमदार आणि दमदार पिक येऊ लागले आहे. त्यांच्या लेखनशैलीने भारतात अभूतपूर्व अशी सामाजिक क्रांती घडवून आणली आहे .कोणत्याही लेखनप्रकाराची विशिष्ट अशी काही रचनातत्वे असली तरी, लेखनशैली ही व्यक्तिसापेक्ष असते. लेखनकृती ही प्रतिभावंताची स्वतंत्र निर्मिती असते. त्यामुळेच ती लेखनकृती स्वतंत्र शैली घेऊन वाङ्मयक्षेत्रात दाखल होते. लेखनशैलीचा हा स्वतंत्र बाणाच त्या लेखनकृतीची साहित्याच्या क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण करते. सर्जनशील लेखनशैलीच्या अंगी केवळ साहित्य प्रवाहालाच नव्हे तर, समाजमनालाही प्रवाहित करण्याचे सामर्थ असते. सर्जनशील लेखन म्हणजे काय ? सर्जनशील लेखनाची संकल्पना- व्यक्तीची कोणतीही लेखनकृती हे सर्जनच असते. नवनिर्मितीच असते.लेखनाच्या माध्यमातून व्यक्तीच्या मनातील वेदना,संवेदना,भाव,विचार, अनुभव शब्दांद्वारे व्यक्त होतात. व्यक्तीचे शब्दांच्या माध्यमातून लिखित स्वरूपात व्यक्त होणे ही घटना अनेकार्थाने प्रभावी व परिणामकारक असते. कारण कोणतेही लेखन हे चिरकाल टिकणारे असते. समाजाला प्रेरक आणि मार्गदर्शक ठरणारे असते. लिखित साहित्यात अंगभूत सामर्थ्य असते. लेखन अनेक पिढ्यांना प्रभावीत करू शकते. तसेच निष्प्रभही करू शकते. लेखनाच्या मुळाशी नेमका कोणता हेतू किंवा उद्देश आहे, यावरून लेखनाची समाजोपयोगिता ठरत असते. लेखन समाजाची विचारशक्ती जागे करणारे असेल. समाजाला विचारप्रवृत्त करणारे व समाजजीवन गतिमान करणारे असेल तर,असे लेखन समाजहीताच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे असते. असे लेखन नवसमाज निर्माणाकरिता हातभार लावणारे असते.असे लेखन हे सर्जनशीलच असते. पुरातन काळात अनेक ग्रंथ स्थितीवादी विचार व्यक्त करणारे होते. त्यामुळे तत्कालीन समाज ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फारशी प्रगती करू शकला नाही. नैतिक,भौतिक दृष्ट्याही अपेक्षित प्रमाणात विकसित होऊ शकला नाही. सतराव्या-अठराव्या शतकापासून म्हणजेच अव्वल इंग्रजी कालखंडापासून भारत आधुनिकतेच्या संपर्कात आला. आधुनिक दृष्टीने धर्माची चिकित्सा करायला लागला. कालबाह्य बंधने झुगारून देऊ लागला. प्रागतिक मूल्ये, आधुनिक विचारसरणी स्वीकारू लागला. नवे साहित्यप्रकार समजून घेऊ लागला.आधुनिक जीवनमूल्ये अंगिकारून नवसमाजनिर्मितीच्या व्यापक उद्देशाने लेखन करू लागला. त्यामुळे समाज सर्वार्थानेच गतिमान होऊ लागला. ही गतिमानतेची प्रक्रिया लक्षात घेऊन आपल्याला असे म्हणता येईल की, जे लेखन समाजाला स्थितीशीलतेतून मुक्त करते. सर्वहिताय् भूमिका घेऊन समाजाला सर्वार्थाने गतिमान करते. समाजाला विचारप्रवृत्त, गंभीर,विवेकी करते ;आणि कालसुसंगत शैली स्वीकारते. तेच लेखन व तीच लेखनशैली खऱ्या अर्थाने सर्जनशील असते. अशा प्रकारे आपल्याला सर्जनशील लेखनाची संकल्पना थोडक्यात व साध्या सोप्या पद्धतीने स्पष्ट करता येईल .

**सर्जनशील लेखनाचे स्वरूप व तत्त्वे-**

साहित्य (literature) ही संज्ञा फार व्यापक आहे. त्यामुळेच मानवी समाजाचा असीम, अमर्याद अवकाश व्यापण्यास साहित्य सक्षम ठरले आहे. साहित्यात कथा, कविता, कादंबरी,नाटक,ललितलेखन, लघुनिबंध,चरित्र, वैचारिक निबंध असे वेगवेगळे लेखनप्रकार आहेत. या लेखनप्रकारांनी अवघे समाजजीवन आपल्या कवेत घेतले आहे. समाजाला अनेकांगांनी शब्दबद्ध केले आहे. या सर्व लेखन प्रकारांचे ठराविक असे स्वरूप,वैशिष्ट्ये,नियम व आकृतीबंध आहेत. कवी,लेखक,प्रतिभावंत आपल्या भावानुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी सहज,सुलभ व सोयीस्कर वाटणाऱ्या लेखनप्रकारातून व्यक्त होतो. आपल्या मनातील भावना, वेदना, संवेदना, अनुभव व विचार शब्दांद्वारे समाजापुढे मांडतो. साहित्याच्या क्षेत्रात प्रतिभावंताने , प्रज्ञावंताने केलेली ही लेखनकृती लेखकाच्या दृष्टीने सर्जनच असते. परंतु ते लेखन समाजाच्या दृष्टीने सर्जनशील ठरण्यासाठी त्या लेखनाचा आशय व विषय समाजहितैशी, दूरदर्शी, गतिशील व कल्याणकारी असणे आवश्यक असते. समाज आणि समाजाचा लघुत्तम घटक हा माणूस असतो. हा लघुत्तम घटक लेखन प्रकारांचा केंद्रबिंदू असणे अनिवार्य आहे. जे साहित्य लेखन समाजातील सर्व प्रकारचा भेदभाव(Discrimination), विषमता (Inequality), शोषण

(exploitation) हे समाजातील कौरुप्य नष्ट करण्यासाठी प्रतिबद्ध असते ;आणि समाजाला अंतर्बाह्य सर्वांगसुंदर करण्याची बांधिलकी (commitment) स्वीकारते तेच लेखन खऱ्या अर्थाने सर्जनशील असते. या सर्जनशील लेखनाचे स्वरूप आकृतीबंधाच्या दृष्टीने परिपूर्ण, प्रमाणबद्ध, काटेकोर व प्रवाही असणे आवश्यक असते. कोणत्याही कलेचे एक रचनातंत्र (फॉर्म) ठरलेले असते. तो भाव , विचार किंवा संवेदना त्या विशिष्ट स्वरुपात व्यक्त झाली की, ती लेखनकृती अथवा कलाकृती त्या लेखनप्रकाराच्या तसेच कलाप्रकाराच्या नावाने ओळखली जाते. जसे एखाद्याच्या मनातील भाव , वेदना , संवेदना काव्यरूप घेऊन व्यक्त झाली तर, आपण त्या रचनेस कविता म्हणतो. कथा घटकांच्या माध्यमातून व्यक्त झाली तर, कथा म्हणतो. म्हणजेच प्रतिभावंताचा , कलावंताचा भावानुभाव कोणते कलारूप घेऊन व्यक्त होते यावर त्या लेखनाचे स्वरूप अवलंबून असते. हे म्हणणे अगदी बरोबर आहे ! परंतु हे लेखन असे म्हणजे, असेच असावे असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण असा साचेबद्धपणा कलेला आणि विचारालाही मारक ठरणारा असतो. असे निर्बंध अभिव्यक्तीची कोंडी करणारे असतात ; आणि मुळात कोणताही कलावंत अथवा प्रतिभावंत हा तसा बंधनं झुगारणारा बंडखोरचं असतो ! विशिष्ट स्वरूपात किंवा प्रारूपातच लेखनाचा आग्रह धरणे म्हणजे सर्जनशीलतेला विसर्जीत करण्यासारखे होईल . तेव्हा लेखकाला लेखनाचे पूर्ण स्वातंत्र्य देणे म्हणजे सर्जनशील लेखनप्रक्रियेला नवे बळ देणे होय , असे म्हणता येईल.

# कोणतीही अभिव्यक्ती ही भाव, विचार अथवा तत्त्वाचे प्रकटीकरणच असते. कला ही तत्त्वांची वाहक असते. चित्रकला, शिल्पकला , लेखनकला इत्यादी सर्व कलांची अंगभूत अशी काही तत्त्वे असतात. त्याचप्रमाणे त्या कोणत्या ना कोणत्या भाव, विचारांचे व तत्त्वांचे कलात्मक रूप असतात. कलेतील भाव अथवा विचार व्यक्तीच्या अभ्युदयासाठी व मानवी समाजाच्या सर्वांगीण उन्नयनासाठी असेल तर,ती कला सर्वार्थाने सर्जनशील ठरते.अशा कोणत्याही सर्जनशील कलेत; आणि विशेष म्हणजे सर्जनशील लेखनशैलीत व्यापकता, कालातीतता ,उदात्तता , गतिशीलता , कल्याणकारकता व मानवता अशी वैश्विक तत्त्वे अंतर्भुत असतात . आणि ज्या लेखनाला अशा वैश्विक तत्त्वांचे अधिष्ठान असते , तेच लेखन सर्वार्थाने सर्जनशील असते . असे आपल्याला निःशंकपणे म्हणता येईल !

**सर्जनशील लेखन कसे करतात ? त्याचे प्रकार**

आपल्या मनातील भावना , विचार, अनुभव लिखित स्वरूपात समाजापर्यंत पोहचविणे याला एक वेगळे महत्त्व आहे . कारण लेखन हे कायमस्वरुपी आहे. शब्दबद्ध झालेले लेखन, लेखन करणारा लेखक आणि लेखनातील भाव-विचार प्रदीर्घ काळ समाजात अस्तित्वात राहतात. त्यामुळे कोणत्याही स्वरुपाचे लेखन सर्वहिताय् भूमिकेतून आणि जबाबदारीपूर्वक केले पाहिजे. अवतीभवतीच्या समाजजीवनात अनेक प्रश्न आहेत. नानाविध समस्या आहेत. ते लेखक सोडवू शकत नाही. परंतु त्या प्रश्नांना वाचा फोडू शकतो . समस्यांच्या मुळाशी जावून समस्यांची जटिलता कमी करू शकतो . आपल्या प्रज्ञेचा व प्रतिभेचा योग्य पद्धतीने वापर करून वाचकांना दिशादिग्दर्शन करू शकतो. व्यक्ती या लघुत्तम घटकाला, समाजाला आणि राष्ट्राला सुद्धा मार्गदर्शक ठरू शकतो. यासाठी प्रतिभावंतांनी, लेखकांनी व कलावंतांनी कलावादी नव्हे तर, जीवनवादी भूमिका घेणे आवश्यक असते. लेखनामध्ये फार मोठी शक्ती आहे. ही बाब लक्षात घेऊन जर लेखन केले तर, लेखक समाज प्रबोधनाचे आणि समाजपरिवर्तनाचे कार्य अतिशय समर्थपणे करू शकतो. समाजपरिवर्तनाचा ध्यास घेऊन केलेले लेखनकार्य हे सर्जनशील लेखन ठरते. असे लेखन मातेच्या ममतेने आणि पित्याच्या कर्तव्य भावनेने करावे लागते...

# लेखनाची प्रक्रिया म्हणजे तसे नव सर्जनच असते. एकंदरीत आपण संपूर्ण लेखन प्रक्रियेलाच सर्जन मानले तर, आपल्याला सर्जनशील लेखनाचे ढोबळ मानाने दोन प्रकार करता येतील. एक म्हणजे स्थितीवादी लेखन आणि दुसरे म्हणजे गतिवादी लेखन. स्थितीवादी लेखन भूतकाळाचा गुणगौरव करणारे आणि वर्तमानाला भूतकाळाच्या गर्तेत लोटणारे असते. तर, गतिवादी लेखन हे वर्तमानाला भूतकाळाच्या अमानुष काळोखातून बाहेर काढणारे आणि भविष्याच्या उज्जवल उजेडाशी जोडणारे असते. असे उजेडगामी लेखन करण्यासाठी प्रज्ञावंतांनी व प्रतिभावंतांनी स्वतःला सूर्यकुळाशी जोडून घेणे आवश्यक असते !

**अत्याधुनिक माध्यमे आणि लेखन-**

मानवी समाजाचा अल्प ज्ञानापासून व मर्यादित लेखन साधनांपासून सुरू झालेला प्रवास आज अथांग ज्ञानापर्यंत आणि विपुल लेखन साधनांपर्यंत येऊन पोहचला आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मनुष्य रोज अत्याधुनिकतेची एक एक पायरी चढत सतत पुढे चालला

आहे. गतिमान साधनांमुळे व वेगवान संपर्क यंत्रणेमुळे जगाचे रुपांतर (Global village) खेड्यात झाले आहे. प्रत्येक व्यक्ती परस्परांशी व जगाशी जुळलेला आहे. प्रत्येकाच्या खिशात आज मोबाईलच्या रुपात जग आहे ! जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेशी आज सामान्यातला सामान्य माणूस अवगत होतो आहे. नवीन पिढीतील युवक तर, मोबाईलद्वारे जग बोटांवर खेळवतो आहे. ब्लॉग व ईमेलच्या माध्यमातून क्षणभरात जगाच्या कानाकोपऱ्यात अतिशय जलदगतीने संदेशाची देवाणघेवाण करणे सहज शक्य झाले आहे. व्हाट्सअप, फेसबुक हा तर, जणू या काळाचा श्वास झाला आहे . व्हॉटस्अप , फेसबुकमुळे सर्वांनाच आपल्या मनातील तगमग, धग फोटो व व्हिडिओ क्लिपद्वारे काही वेळात हजारो लोकांपर्यंत पोहोचविण्याची सोपी आणि सुलभ पद्धती उपलब्ध झाली आहे. इंस्टाग्राम, ट्विटर ही अत्याधुनिक माध्यमे तर नव्या पिढीच्या (स्टेटस सिंबॉल) प्रतिष्ठेची ओळख झाली आहे. या माध्यमांच्या वापरामुळे नवीन पिढी अधिक अद्यावत (अप टू डेट) झाली आहे. नवनवीन व्हिडिओ क्लिप बनविणे , रिल्स बनविणे. त्यातून काही संदेश देणे. नवा विचार मांडणे या गोष्टी आधुनिक संवाद साधनांमुळे अधिक सुलभ व सोप्या झाल्या आहेत. या माध्यमांच्या वापरामुळे नवनवीन व्यवसायांचे व जाहिरातींचे फार मोठे क्षेत्र तरुणांना उपलब्ध झाले आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने आधुनिक शेतीचे ,शेती आधारित उद्योगांचे, अन्नप्रक्रिया उद्योगांचे, लघु चित्रपटांचे ,अभिनयाचे अशा असंख्य उद्योगांचे महाद्वार उघडल्या गेले आहे.

# आधुनिक संवाद व संपर्क यंत्रणेचा विकास एकूणच जगासाठी व जगातील सर्व लोकांसाठी फार उपकारक ठरतो आहे. परंतु या साधनांचा वापर योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे . या साधनांचा गैरवापर समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने घातक ठरण्याची दाट शक्यता आहे. ही संपर्क व संवाद यंत्रणा दुष्ट हेतुने वापरल्यास समाजातील साध्या, सरळ व तंत्रनिरक्षर व्यक्ती फसवणुकीच्या जाळ्यात अडकण्याचा फार मोठा धोका निर्माण झाला आहे. अशा घटनांचा प्रतिरोध करणारी व त्याला कायद्याचे संरक्षण देणारी यंत्रणा देखील उभी होण्याची गरज आहे .

**इतिवृत्त लेखन म्हणजे काय? इतिवृत्त लेखनाचे महत्त्व आणि घटक -**

जगातील अनेक राष्ट्रे विकसित झाली आहेत. अनेक राष्ट्रे विकसनशील अवस्थेतून विकसित होण्याच्या मार्गावर आहेत. संपूर्ण जग ज्ञान,विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगत झाले आहे. जगाने औद्योगिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या उद्योग,व्यवसाय व व्यापाराशी जुळलेला आहे. आपल्या अवतीभवती वेगवेगळ्या क्षेत्रात कामे करणाऱ्या अनेक नोंदणीकृत संस्था, संघटना व कार्यालये सुरू झाली आहेत.या संस्था,संघटना अनेक लोक एकत्र येऊन सामुहिकपणे चालवतात. संस्था, संघटना चालविण्याचे काही उद्दिष्ट्ये,नियम असतात. नियमानुसार या संस्था, संघटना , प्रतिष्ठाने व कार्यालये यांच्या ठराविक कालावधित आढावा सभा घेतल्या जातात. किंवा काही घटना , प्रसंगाच्या निमित्ताने सभा घेतल्या जातात. या सभेतील कामकाजाच्या क्रमवार आणि तपशिलासह घेतलेल्या बारिकसारीक व महत्वपूर्ण नोंदी म्हणजे इतिवृत्त लेखन होय. इतिवृत्त लेखन हे संस्था, संघटना व कार्यालयातील अंतर्गत व्यवहाराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते. त्यामुळेच त्याला अंतर्गत व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण दस्ताऐवज म्हटले जाते. इतिवृत्तात सभेचे स्थळ,वेळ, दिनांक, वार,सभेचे अध्यक्ष, सभेतील विषय, पारित ठराव ,पटलावर आलेले इतर विषय, सर्वानुमते तसेच बहुमताने घेण्यात आलेले निर्णय अशा सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक असते. इतिवृत्ताचे लेखन करणाऱ्या (चिटणीस) व्यक्तीने अतिशय जबाबदारीपूर्वक व तटस्थ वृत्तीने इतिवृत्त लिहिणे आवश्यक असते. इतिवृत्त लेखनाची भाषा सुस्पष्ट, आटोपशीर व अचूक असणे आवश्यक असते. इतिवृत्त लेखन पाल्हाळीक, संदिग्ध व एकांगी नसावे. ते सर्वसमावेशक, तटस्थ व संक्षिप्त स्वरुपात असावे. इतिवृत्त लेखनात खोडतोड असू नये,ते सुवाच्य व सुस्पष्ट असावे. इतिवृत्त लिहून पूर्ण झाल्यानंतर त्या खाली सभेच्या अध्यक्षाची व सचिवाची सही असणे अत्यावश्यक आहे. सही शिवाय इतिवृत्त लेखनाला परिपूर्णता प्राप्त होत नाही. संस्था, संघटना व कार्यालयीन कामकाजात इतिवृत्त लेखनाला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. इतिवृत्त लेखन म्हणजे संस्था ,संघटना व कार्यालयांच्या अस्तित्वाचा व कार्यकर्तृत्वाचा लिखित पुरावाच होय. इतिवृत्त लेखनाचे ठळकपणे दोन प्रकार पडतात .

१) अहवालात्मक इतिवृत्त लेखन

२) वृतांतात्मक इतिवृत्त लेखन

विशिष्ट हेतुसिद्धीसाठी जाणिवपूर्वक गोळा केलेली आणि सूत्रबद्ध पद्धतीने लिहिलेली माहिती म्हणजे अहवालात्मक इतिवृत्त लेखन होय. तर, घडलेल्या घटनेची किंवा कार्याची

तपशीलवार एकत्रित केलेली माहिती क्रमवार पद्धतीने लिहून काढणे म्हणजे वृत्तांतात्मक इतिवृत्त लेखन होय.

# एकूणच इतिवृत्त लेखनाला संस्था, संघटनांच्या व कार्यालयीन कामकाजाच्या क्षेत्रात अतिशय महत्त्व आहे. नोंदणीकृत संस्था,संघटनांच्या उत्तरोत्तर वाढीच्या व अस्तित्वाच्या दृष्टीने इतिवृत्त लेखन हा महत्त्वपूर्ण दस्ताऐवज असतो. त्याकरिता इतिवृत्ताचे लेखन व जतन होणे आवश्यक आहे